# <u>प्रेस नोट</u>

## <u>लातूर जिल्हा पोलीस भरती-२०२२-२०२३</u>

**दिनांक २१.०६.२०२४**

---

लातूर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस भरती सन २०२२-२०२३ ची **"<u>शारिरिक मोजमाप व शारिरिक चाचणी</u>"** प्रक्रिया दिनांक २१.०६.२०२४ रोजी सकाळी ०४.०० वाजता पासून पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर येथे सुरू झालेली आहे.

सदर पोलीस भरती २०२२-२०२३ प्रक्रियेमध्ये दिनांक २१.०६.२०२४ रोजी **(१०६८)** उमेदवारांना **" <u>शारिरिक मोजमाप व शारिरिक चाचणी</u> "** करीता बोलाविण्यात आलेले होते. त्यापैकी **(६६५)** उमेदवार सदर भरती प्रक्रियेस उपस्थित राहिले असुन **(४०३)** उमेदवार हे दिनांक २१.०६.२०२४ रोजीच्या पोलीस भरती प्रक्रियेस गैरहज राहिले आहेत.

पोलीस भरती प्रक्रियेस हजर असलेल्या **(६६५)** उमेदवारांपैकी **(९३)** उमेदवार हे अपात्र ठरलेले आहेत. उर्वरित **(५७२)** उमेदवार हे शारिरीक मैदानी (१६००/१०० मि. धावणे व गोळाफेक) चाचणीसाठी पात्र झाल्याने त्यांची शारिरीक मैदानी चाचणी घेण्यात आलेली असुन त्यामध्ये उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी या कार्यालयाचे संकेतस्थळ **<u>www.laturpolice.gov.in</u>** वरती प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर आणि पोलीस मुख्यालय, लातूर येथील दर्शनी भागावर डकविण्यात आली आहे.

सदर प्रमाणे प्रसिद्ध करण्यात आलेल्या गुणांचे यादीबाबत उमेदवारांचा काही आक्षेप असल्यास त्यांनी (४८) तासामध्ये लेखी आक्षेप या कार्यालयाचे ई-मेल आयडी **<u>sp.latur@mahapolice.gov.in</u>** यावरती नोंदविण्यात यावा यानंतर प्राप्त होणारे आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक २२.०६.२०२४ रोजी मैदानी चाचणीकरिता येणारे उमेदवारांनी सकाळी ०४.०० वा. "शारिरीक मोजमाप चाचणी व मैदानी चाचणी" करीता पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर येथे हजर रहावे. प्रवेशपत्र महा आयटी कडुन उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. सर्व उमेदवारांनी दुपारी १२.०० वा.पर्यंत पोलीस मुख्यालय, बाभळगांव लातुर येथील मैदानावरती हजेरी लावणे अनिवार्य आहे. तसेच त्यांनी या कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या सुचनाप्रमाणे कागदपत्रे घेऊन पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर येथे उपस्थित रहावे.

**<u>टिप:- सदर भरती प्रक्रिये दरम्यान शारिरिक मोजमाप चाचणीमध्ये पात्र असलेल्या उमेदवारांचीच शारिरीक क्षमता (धावणे व गोळा फेक) चाचणी घेण्यात येईल. सदर चाचणीकरिता प्रत्येक टप्यावर पात्र उमेदवारांस उपस्थित रहाणे अनिवार्य आहे. म्हणुन सदर भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवारांनी त्यांची शारिरिक चाचणी पुर्ण होई पर्यंत त्यांनी पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर येथे हजर रहावे लागेल या पुर्व तयारीनिशी यावे लागेल.</u>**

(सोमय मुंडे)
पोलीस अधीक्षक, लातूर

प्रति,

व्यवस्थापक,
दैनिक ..........................................................